# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
# Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२८२१७२८, २२८२११६७
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


**जाहिरात क्रमांक : १३/२०१५** **धारिका क्रमांक : २०४४(९)/३६२/सात**

आयोगामार्फत **अधिष्ठाता, शासकीय कला संस्था, कला संचालनालय, महाराष्ट्र कला शिक्षण सेवा गट-अ उच्च व तंत्रशिक्षण विभाग** पदावरील सरळसेवा भरतीसाठी **ऑनलाईन** पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदासाठी खालील अटी व अर्हतांची पूर्तता करणारे उमेदवार अर्ज करू शकतात.

**२. उपलब्ध पदसंख्या :- एकूण-२. अराखीव-१ व अनुसूचित जाती-१**

(१) वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

(२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक एडीआर/२०११/(१४/११)/तांशि-६, दिनांक- १४ जानेवारी,२०११ नुसार खालील अपंगत्व असलेले उमेदवार प्रस्तुत पदासाठी अर्ज करण्यास पात्र आहेत:-

**(अ)** चलनवलन विषयक विकलांगता व मेंदूचा अर्धांग वायू (Locomotor disability or Cerebral Palsy).

**(ब)** श्रवणशक्तीतील दोष (Hearing impairment)

(३) मुलाखतीसाठी पाचारण केल्या गेलेल्या खेळाडू उमेदवारांनी त्यांची खेळाडूअसल्याची प्रमाणपत्रे क्रीडा संचालनालयाकडून प्रमाणित करुन घ्यावीत.

**३. वेतनश्रेणी-** रु १५,६०० – ३९,१०० + ग्रेड पे रु. ८,६००/- , **एकूण वित्तलब्धी अंदाजित रु. ५८,०००/-.**

**४. पात्रता:-**

**४.१** भारतीय नागरिक.

**४.२ वय:-:-** (१) **दिनांक १ ऑगस्ट, २०१५** रोजी **४५** वर्षे, मागासवर्गीयांसाठी **५** वर्षे शिथिलक्षम. **तथापि, मागासवर्गीय उमेदवार आणि खेळाडू यांना असलेली वयोमर्यादेतील शिथीलतेची सवलत यापैकी कोणतीही अधिकतम असलेली एकच सवलत देय राहील.**

(२) अगोदरपासून महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील कर्मचा-यांना उच्च वयोमर्यादा लागू नाही.

(३) शासन आदेशानुसार माजी सैनिक, अपंग व खेळाडू इत्यादीसाठी वयोमर्यादा शिथिलक्षम राहील.

(४) **Provided** that, the age limit may be relaxed in favour of candidates possessing exceptional qualifications or experience or both. **परंतु आयोगाच्या कार्यनियमावलीतील प्रमाणानुसार जेव्हा मुलाखतीसाठी उमेदवार प्राप्त होत नसतील तेव्हाच हा नियम विचारात घेतला जाईल. अशा प्रत्येक प्रकरणी उपलब्ध उमेदवारांच्या उच्चतम शैक्षणिक अर्हतेच्या दोन स्तर उच्च शैक्षणिक अर्हताप्राप्त उमेदवारच वयोमर्यादेत सवलतीकरीता विचारात घेतले जाईल. अनुभवाच्या संदर्भात ज्या पदावरील किमान अनुभव मागितला असेल त्यापेक्षा वरिष्ठ पदावरील अनुभव वयोमर्यादा शिथिलीकरणास्तव विचारात घेतला जाईल.**

**४.३ शैक्षणिक अर्हता व** अनुभव :-

4.3.1 Have passed the Secondary School Certificate Examination or any other examination recognized by Government as equivalent thereto;

4.3.2 Possess a Master's degree in Drawing and Painting or Sculpture and Modelling or Applied Art or

4.3.3 Possess a Bachelor's degree in Drawing and Painting or Sculpture and Modelling or Applied Art atleast in the Second Class or

4.3.4 Possess a Diploma awarded by Government in Drawing and Painting or Sculpture and Modelling or Applied Art, at least in the Second Class; or any other qualification recognized by the Government to be equivalent thereto, and

4.3.5 Have practical experience of teaching Art in any institute of Art, recognized by Government or combined professional and teaching experience for a period of not less than **8 (Eight) years**. Out of

which **2 years** experience must be as Professor gained after acquiring the qualification in para 4.3.2, 4.3.3 or 4.3.4.

**Note-**(a) Provided further that preference may be given to candidates possessing Art Master's Certificate or Diploma awarded by Government.

(b) Provided also that, the requirement as to diploma in the second class may be waived in the case of candidates serving in the Directorate of Art from the date of acquiring the qualifications.

**Explanation** – For the purpose of these rules a Diploma shall be deemed to have been obtained in the second class where no classes are awarded for such Diploma.

(c) If at any stage of selection, the Maharashtra Public Service Commission is of the opinion that sufficient number of candidates possessing the requisite higher basic academic qualifications or experience are not available to fill up the vacancies reserved for candidates belonging to the scheduled castes, scheduled castes converts to Buddhism, then, the Commission may in the matter of such selection relax the requirement in the respect of the Class prescribed academic qualifications or the period of experience (to the extent 40%) or both, set out therein and select suitable candidates belonging to such Castes.

टीप- 'Government Art Institute means the Sir J J School of Art, Bombay, the Sir J J Institute of Applied Art Bombay, Chitrakala Mahavidyalaya Nagpur or the Government School of Art, Aurangabad.'

५. प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून, किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरिता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरून प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टीने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता/अनुभव यांच्या आधारे निकष निश्चित करून अथवा चाळणी परीक्षेद्वारे मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि / अथवा अनुभव शिथिल **केला जाणार नाही. चाळणी परिक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येतील. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क,निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया इत्यादीबाबतच्या** सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

६. **जे उमेदवार चुकीची माहिती सादर करतील त्यांना या व पुढील सर्व निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.**

७. **कर्तव्ये व जबाबदा-या**:- प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदा-या याबाबतचा तपशील आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

८. **शुल्क : १) अमागास - रु. ५१५/- २) मागासवर्गीय - रु. ३१५ /-**

**"आयोगाच्या नवीन धोरणानुसार मागासवर्गीय उमेदवारांनी अराखीव पदांसाठीच्या आवश्यक अटी व शर्तींची पुर्तता ( उदा. वयोमर्यादा, परीक्षा शुल्क व अर्हता ईत्यादी ) केल्यासच अशा उमेदवारांची अराखीव पदावर शिफारस करण्यात येईल."**

९. **अर्ज करण्याची पद्धत** :-

९.१ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

९.२ **पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज** www.mahampsc.mahaonline.gov.in **या वेबसाईटद्वारे दिनांक १६ एप्रिल, २०१५ ते दिनांक ६ मे, २०१५ या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.**

९.३ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mahampsc.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

९.४ विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

९.५ आयोगाने निश्चित केलेले परीक्षा शुल्क खालील पद्धतीने भरता येईल :-

(१) भारतीय स्टेट बॅंकेमध्ये चलनाद्वारे (२) नेटबॅंकिंग (३) डेबिट कार्ड. (४) क्रेडिट कार्ड. (५) संग्राम केंद्र / सीएससी (नागरिक सेवा केंद्र)

९.६ www.mahaonline.gov.in येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायंतीमध्ये) आणि सीएससीची सूची उपलबध आहे.

९.७ परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

(१) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील " माझे खाते " या लिंक वर क्लिक करावे.

(२) " माझे खाते " या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर 'Unpaid' असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी 'Pay Now' अशी लिंक उपलब्ध असेल.

(३) " Pay Now " या लिंक वर क्लिक केल्यानंतर 3 पर्याय उपलब्ध होतील. 1. ऑनलाईन पेमेंट 2. नागरी सुविधा केंद्र 3. चलानद्वारे

(४) उमेदवार क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबॅंकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील.

(५) नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुक्लाचा भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

(६) उमेदवाराने चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुक्लाचा भरणा केला जाऊ शकतो.

(७) ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

(८) परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर - उमेदवाराला परीक्षा केंद्राची निवड करणे आवश्यक आहे. त्याकरिता " माझे खाते " मधील आवश्यक पदाची निवड करावी. त्यानंतर " केंद्र निवडा " या पर्यायावर क्लिक करावे. सदर पर्यायांतर्गत निवडलेल्या केंद्राची क्षमता दर्शविली जाईल. जर केंद्राच्या क्षमतेइतक्या उमेदवारांचे अर्ज तत्पूर्वी प्राप्त झाले असतील, तर सदर केंद्र उपलब्ध नसून, दुसरे केंद्र निवडावे, असा संदेश प्राप्त होईल. केंद्राची निवड केल्यानंतर सेव्ह बटनावर क्लिक केल्यास केंद्र निवडीची व अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण होईल.

(९) जे उमेदवार भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्काचा भरणा करतील, असे उमेदवार शुल्क भरल्याच्या दिनांकाच्या दुस-या दिवशी केंद्र निवडिची प्रक्रिया करु शकतील. जर हा दुसरा दिवस कार्यालयीन सुट्टी अथवा रविवारचा असेल तर उमेदवार सदर कार्यावाही त्यानंतर लगेच येणा-या पुढील कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी करु शकतील.

१०. चाळणी परीक्षा घ्यावयाचे ठरल्यास सदर परीक्षेच्या अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर व परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशप्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

११. परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

१२. **मुलाखतीच्या दिवशी सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा मुलाखत घेण्याचे नाकारण्यात येईल.**

१३. **विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्याची कार्यवाही दिनांक ६ मे, २०१५ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.**

१४. **चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक ७ मे, २०१५ पर्यंत बॅंकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.**

**ठिकाण : मुंबई** **सु. सं. केसरकर**

**दिनांक : १६ एप्रिल, २०१५** **उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग.**